# निवडणूक खर्च आणि निवडणूक सुधारणा

प्रा.डोंगरे एल.बी
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
ह.ज.पा.महाविद्यालय,हिमायतनगर जि.नांदेड

**प्रस्तावना :-**

भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही संपन्न मोठा देश आहे. ६६ वर्षाच्या वाटचालीतून भारताची लोकशाही समृध्द, संपन्न, प्रगल्भ होत गेली. लोकशाही राजकीय व्यवस्थेत राजकीय परिवर्तन घडवून आणण्यासाठी निवडणूक या मार्गाचा अवलंब केला जातो. लोकशाही राजकीय व्यवस्थेत राजा हा मातेच्या पोटातून जन्मत नाही. नाही तर मताच्या पेटीतूनच जन्माला येतो. लोकशाही राजकीय व्यवस्थेत राजकीय परिवर्तन करण्यासाठी निवडणूक हा मुख्य आधार आहे. या निवडणुका शांत, भयमुक्त, पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी घटनाकार डॉ.आंबेडकरांनी घटनेच्या कलम ३२४ मध्ये निवडणूक आयोगाची तरतूद केली आहे. हा निवडणूक आयोग शासनाच्या हस्तक्षेपापासून कसा मुक्त राहील आणि प्रभावीपणे निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी कसा कार्यप्रवण होईल, याचा सखोल विचार करुन घटनाकारांनी निवडणूक आयोगाला घटनात्मक संस्थेचा दर्जा प्रदान केला. भारतीय निवडणूक आयोगाने लोकसभेच्या १६ निवडणुका आणि २९ घटक राज्यांच्या विधानसभा निवडणुका, राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती यांच्या निवडणुका काही उणिवा वगळता प्रभावीपणे पार पाडल्या आहेत. लोकशाही व्यवस्थेत निवडणूक खर्च हा विषय राज्यशास्त्र अभ्यासकांच्या, विचारवंतांच्या चिंतेचा आणि चिंतनाचा विषय बनला आहे. निवडणूक प्रक्रिया पार पाडत असतांना उमेदवाराकडून निवडणूक प्रक्रियेत वेगवेगळ्या असंवैधानिक आणि असामाजिक तत्त्वांचा वापर वाढल्यामुळे निवडणुकीत Cash, Caste, Crime, Communalism, Corrpution या C५ ने लोकशाहीसमोर एक आव्हान निर्माण केले आहे. निवडणूक प्रक्रियेत निर्माण झालेल्या पैसा, जात, धर्म, गुन्हेगारी, भ्रष्टाचार, हिंसा या असामाजिक तत्त्वांना आवर घालण्यासाठी निवडणूक आयोगाने निवडणूक खर्च आणि निवडणूक सुधारणा यावर गंभीर विचार करुन महत्वपूर्ण अशा निवडणूक सुधारणा केल्या आहेत. त्यामुळे निवडणुका काही अपवाद वगळता शांत, भयमुक्त, पारदर्शकपणे पार पाडल्या जात आहेत.

**निवडणूक खर्च आणि निवडणूक सुधारणा :-**

भारतीय लोकशाही प्रक्रियेत निवडणुका हा महत्वाचा विषय आहे. निवडणूक प्रक्रियेतील असंसदीय आणि असामाजिक तत्त्वाचे वर्चस्व हे सामान्य भारतीय माणसाच्या मनातील लोकशाहीच्या विश्वासर्हतेला तडा देणारे ठरले आहे. म्हणून असामाजिक असंसदीय तत्त्वांना लगाम घालण्यासाठी निवडणूक आयोगाने १९७० ते आजतागायत ज्या सुधारणा केल्या. त्या सामान्य माणसाचा लोकशाही व्यवस्थेवरचा विश्वास अबाधित ठेवणारा आहे. सामान्य माणसाच्या लोकशाहीवरचा विश्वास, श्रध्दा वाढवून त्यांचा लोकशाहीकरणाच्या प्रक्रियेत सक्रीय सहभाग वाढवून घेण्यासाठी निवडणूक आयोगाने केलेले कार्य प्रशंसनीय आहे. निवडणूक आयोगाने निवडणूक सुधारणा करण्याच्या अनुषंगाने निवडणुकीतील खर्च कमी करण्यासाठी १९८२ मध्ये लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकत्रीतपणे घेण्याचा निर्णय घेतला. ३ डिसेंबर १९८३ ला मुख्य निवडणूक आयुक्त रामकृष्ण त्रिवेदी यांनी ४९ राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींच्या संमतीने निवडणूक आचार संहीता निर्माण केली. या निवडणूक आचारसंहितेत महत्वपूर्ण असे बदल करण्यात आले.

त्यानंतर माजी निवडणूक आयुक्त टि.एन.शेषन यांनी आदर्श आचारसंहीता तयार करुन निवडणुकीतील अपप्रवृत्तींना पूर्णपणे लगाम घालून निवडणूक आयोगाचे महत्व अधोरखीत केले. १९७५ मध्ये निवडणूक आयोगाने वि.म.तारकुंडे समिती, १९८२ मध्ये वोरा समिती, १९९८ मध्ये इंद्रजित गुप्ता समिती, दिनेश गोस्वामी समिती, के.संथनाम समिती अशा विविध समित्या निवडणूक सुधारणेच्या दृष्टीने स्थापन करण्यात आल्या आहेत. या सर्व समित्या, आयोगाने आपला अहवाल सादर केला असला तरीही त्या शिफारशींची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्यामुळे निवडणूक प्रक्रियेत गतिरोध निर्माण होत आहे.

भारतातील निवडणुकांमध्ये वाढलेल्या पैशाचे प्राबल्य हे लोकशाहीसमोर मोठे आव्हान आहे. १९५२ च्या लोकसभा निवडणूकीत १.४५ कोटी एवढा खर्च झाला होता. १९५७ च्या लोकसभा निवडणुकीत ५.९ कोटी इतका खर्च झाला होता. १९८० च्या लोकसभा निवडणुकीत ५४ कोटी इतका खर्च झाला होता. १९९१ च्या लोकसभा निवडणुकीत ३५९ कोटी इतका खर्च झाला होता. १९९९ च्या लोकसभा निवडणुकीत ८८० कोटी इतका खर्च झाला होता. २००९ च्या लोकसभा निवडणुकीत १३०० कोटी इतका खर्च झाला होता. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत ३५०० कोटी एवढा सरकारी दृश्य स्वरुपातील खर्च आहे. भारताच्या लोकसभा निवडणुकीत खर्चाचा आलेख हा कमी होण्याऐवजी तो उत्तरोत्तर वाढल्याचे दिसून येत आहे. निवडणूक खर्चात भारत हा जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे.

लोकसभा आणि विधानसभा उमेदवारांना निवडणूक किती पैसे खर्च करावेत या संदर्भात निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सुचना असतांना सुध्दा मर्यादेपेक्षा जास्त पैसे उमेदवार खर्च करतांना दिसून येतात. निवडणूक प्रक्रियेत पैशाचे प्राबल्य वाढल्यामुळे चारित्र्यवान, नितीमान, गुणवान राजकीय नेतृत्व हे लोकशाहीच्या राजकीय सहभागापासून हद्दपार झाले आहे आणि धनदांडग्या, माफीया, भांडवलदार, जमीनदार यांच्यासाठी निवडणुका आणि राजकारण व्यवसाय झाला आहे. म्हणून सामान्य भारतीय माणूस हा केवळ बटण दाबण्यापुरता मर्यादीत राहीला आहे. लोकसभा आणि विधानसभा उमेदवार निवडणुकीत वाममार्गाने कमविलेला पैसा वापरला जातो. राजकीय नेतृत्व हे निवडणुका लढविण्यासाठी व्यापारी, भांडवलदाराकडून पैसे घेतात आणि सत्ता प्राप्त केल्यानंतर त्यांच्यासाठीच अनुकूल धोरणे आणि कायदे करण्यासाठी वचनबध्द असतात. देशाचे नेतृत्व करणारा, देशाच्या ध्येय-धोरणांची आखणी आणि कायदयाची निर्मिती करणारा, समाजाला दिशा देणारा वर्ग जर भांडवलदारांच्या काळया पैशाने नियंत्रित होत राहीला तर भारतात भांडवली लोकशाही निर्माण होईल. भांडवलदारांचे, माफीयांचे, गुन्हेगारांचे, जातीयवादयांचे, धर्मांधाचे शासन रोखावयाचे असेल तर निवडणुकीतील काळया पैशाचा प्रभाव संपुष्टात आणला पाहिजे. निवडणूक प्रक्रियेतील पैशाचा प्रभाव रोखण्यासाठी निवडणूक आयोगाने ठोस भूमिका घेतली आहे. यामध्ये ३० दिवसांच्या आत खर्चाचा हिशोब देणे उमेदवारास बंधनकारक आहे. अनेक उमेदवारांनी खर्चाचा हिशोब विहीत मुदतीत न दिल्यामुळे मे - २०१३ मध्ये भारतीय निवडणूक आयोगाने २०४५ उमेदवारांना जानेवारी - २०१६ पर्यंत लोकसभा आणि विधानसभा निवडणुका लढविण्यास अपात्र ठरविले आहे. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने खर्चाचा हिशोब मुदतीत देण्यास कसूर केल्यास त्या बाबत योग्य कारण दिले नसल्यास निवडणूक आयोग अशा उमेदवारास अपात्र म्हणून जाहीर करण्याचा अधिकार आहे. १६ व्या लोकसभेच्या निवडणुकीत निवडणूक आयोगाने आंध्रप्रदेशातून १२४ कोटी रुपये, तामीळनाडू ४० कोटी, पंजाब ३६ कोटी, महाराष्ट्र २४ कोटी, कर्नाटक २० कोटी रुपये जप्त केले आहे. निवडणूक प्रक्रियेत मतदारांना आमिष दाखविण्यासाठी दारुचा सर्रास वापर केला जातो. यामुळे

यावर प्रतिबंध करण्यासाठी निवडणूक आयोगाने ठोस पावले उचलली आहेत. त्यामध्ये २०१४ च्या १६ व्या लोकसभेच्या निवडणुकीत पंजाबमधून ६५ लाख लिटर दारु, पश्चिम बंगाल २२ लाख लिटर, गुजरात १६ लाख लिटर, दिव-दमन १५ लाख लिटर, महाराष्ट्र ९ लाख लिटर दारु जप्त केली आहे. निवडणुकीतील पैशाच्या प्राबल्याला रोखण्यासाठी निवडणूक आयोगाने स्टॅटिक स्कॉड, मोबाईल स्कॉड या दोन पथकाची निर्मिती केली आहे. उमेदवाराला २० हजाराच्यावर खर्च करावयाचा असल्यास धनादेशाचा वापर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. आज झालेला खर्च हा दुसऱ्या दिवशी निवडणूक आयोगाने दिलेल्या तक्त्यामध्ये भरुन संबंधित अधिकाऱ्याकडे सादर करणे बंधनकारक आहे. उमेदवाराचा सर्व खर्च हा बँकेमार्फत करण्यात यावा. पेडन्युज वर लक्ष ठेवण्यासाठी निवडणूक आयोगाने स्वतंत्र समिती गठीत केली आहे. महाराष्ट्र राज्याच्या विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम घोषीत झाल्यानंतर निवडणूक आयोगाने महाराष्ट्रातील वेगवेगळया भागातून २४ कोटी रुपये जप्त केले आहे. निवडणूक प्रक्रियेतील खर्चाला लगाम घालण्यासाठी निवडणूक आयोग शर्थीचे प्रयत्न करतांना दिसून येत आहे. निवडणूक आयोगाच्या प्रयत्नांना मतदाराची मानसिकता, राजकीय पक्षाची मानसिकता, राजकीय इच्छाशक्तीचा पाठींबा मिळाल्यास निवडणूक प्रक्रियेतील अमर्यादीत होणाऱ्या पैशाच्या वापरास प्रतिबंध घालणे शक्य होईल.

**निष्कर्ष :-**

भारताच्या लोकशाहीला समृध्द, संपन्न बनविण्यात निवडणूक प्रक्रियेचा मोलाचा वाटा आहे. निवडणूक प्रक्रियेत वाढत्या पैशाचे प्राबल्य आणि निवडणूक आयोगाने केलेल्या सुधारणांचा आढावा प्रस्तुत संशोधनात करण्यात आला आहे. निवडणूक आयोगाने निवडणूक सुधारणा करीत असतांना निवडणूक आयोगाने नाविन्यपुर्ण पावले उचलावीत, राजकीय जागृती वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत, गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीला उमेदवारी नाकारावी, NOTA (None of the above) प्रमाणे उमेदवाराला परत बोलाविण्याचा (Right to recall) अधिकार असावा, ऑस्ट्रेलिया प्रमाणे सक्तीच्या मतदानाची पध्दत स्विकारावी, निवडणूक विषयक गुन्हयाच्या शिक्षेत वाढ करावी, आदर्श आचारसंहितेला घटनात्मक दर्जा दयावा, राजकीय पक्षाच्या खर्चावरही मर्यादा आणावी, पेडन्युज प्रकरणी प्रभावी कायदा बनवावा. अशा प्रकारच्या कठोर उपाययोजना निवडणूक आयोगाकडून झाल्यास निवडणुकीतील पैशाच्या प्रभावास रोखण्यास मदत होईल. पैशाच्या प्रभावाची पाळेमुळे खोलवर रुजलेली असल्यामुळे वरवरचे उपाय करुन चालणार नाही तर यासाठी मुलभूत स्वरुपाचे आर्थिक व राजकीय परिवर्तन घडवून आणावे लागेल. मतदारांची मानसिकता व राजकीय इच्छाशक्ती बदलल्यास निश्चितीच निवडणुकीत पैशाचा प्रभाव कमी होऊन निवडणुका शांत, पारदर्शक, भयमुक्त वातावरणात संपन्न होण्यास मदत होऊन सशक्त लोकशाहीची पाळेमुळे खोलवर रुजविण्यास मदत होईल.

**संदर्भसूची :-**

१)अशोक कुमार, राजनिती विज्ञान , उपकार प्रकाशन, नवी दिल्ली.

२) राजशेखर सोलापूरे, भारतीय शासन आणि राजकारण , अरुणा प्रकाशन, लातूर.

३)योजना , मासिक जुलै - २०१४

४)दैनिक लोकमत , २१ सप्टेंबर २०१४

५) बी.एल.फडीया, राजनिती विज्ञान , प्रतियोगीता प्रकाशन, नवी दिल्ली.